नियमित फौजदारी खटला नं.११८/२०२२
निशाणी- १०

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- स्वाती सतिष वैराळ
वयः- २७ वर्षे, धंदाः- काही नाही.
राहणार- आर्दशनगर, बोल्हेगाव, अहमदनगर.

## सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती.पी.आर.जासूद यांचेकडूनः-

१. मी आरोपीला ओळखते. ते माझे पती आहेत. दि.०६-०९-२०२१ रोजी रात्री ७.३० वाजता मी व माझी आई माझी मुले आणण्यासाठी आरोपीच्या आजीच्या घरी लक्ष्मीनगर, तपोवन येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे माझा नवरा, माझे सासूसासरे व आजी सासू होती. तेथे माझे पतीने मला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व मी शिवीगाळ करु नका असे म्हटले असता माझे पतीने लोखंडी रॉडने माझे व माझे आईच्या डोक्यात मारले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हाला सिव्हील हॉस्पीटलला पाठवले. सिव्हील हॉस्पीटलमधून आल्यानंतर आम्ही फिर्याद दिली. सदर फिर्याद मला दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.११ देण्यात येत आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

## उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.आर.पी.शेलोत यांचेकडूनः-

२. माझे माहेर निंबळक येथे आहे. आमचे मुळ गाव राजेगाव आहे परंतु लहानपणापासून आम्ही निंबळक येथे राहतो. आरोपीचे मुळ गाव हिंगणगाव तालुका नगर आहे. आमचे लग्न चर्च मधील पुजारी अशोक पाडळे यांनी जमवले होते. आमचे लग्न दि.३०-०५-२०१२ रोजी झाले. लग्नानंतर मी नेवासा येथे नांदण्यास गेले. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा येथे मी, माझे सासूसासरे व दीर असे एकत्र राहत होतो. त्यावेळी माझे सासरे वनविभागात सरकारी नोकरीला होते. माझे पती काहीही करत नव्हते. नेवासा येथे सहा महिने राहिल्यानंतर आम्ही सर्व पुणे येथे

राहण्यास गेलो. आम्ही पुणे येथे मानससरोवर उरलीकांचन येथे राहत होतो. घटने आगोदर एक महिना मी व आरोपी पुणे येथून नगर येथे आलो. मला व आरोपीला दोन मुले आहेत. आम्ही पुणे येथे राहत असताना माझी आजी सासू नगर येथेच राहत होती. पुणे येथे असताना आरोपी रक्त लघवी तपासण्याचे व वॉटर फील्टर दुरुस्त करण्याचे काम करत होता. नगर येथे आल्यानंतर तो बँकेत काम करत होता. हे म्हणणे खरे आहे की, पुणे येथे असताना माझे, माझे पतीशी व सासूसास-यांशी वाद होत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या भांडणाचे कारण म्हणजे मी मोबाईलवर तासंतास बोलत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नव-याला नेहमी त्याचे आईवडीलांपासून वेगळे राहण्यास सांगत होते.

३. पुण्यावरुन नगर येथे आल्यानंतर मी, माझे पती व मुले रेणुकानगर, बोल्हेगाव येथे स्वतंत्र खोली घेऊन राहत होतो. नगर येथे आल्यानंतर आम्हाला जी खोली भेटली त्यामध्ये आम्ही आमचे सामान ठेवले. त्या खोली पासून माझे आईवडीलांचे घर ७ ते ८ किलोमिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, नगरला आल्यानंतर आरोपी त्याचे आजीला भेटण्यासाठी जात होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६-०९-२०२१ पुर्वी माझे सासूसासरे माझे आजी सासूकडे राहण्यास आले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दोन दिवस आगोदर आरोपी आमच्या मुलांना घेऊन तपोवन रोडला त्याचे आजीकडे गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दोन दिवस परत आला नाही म्हणुन दि.०६-०९-२०२१ रोजी मी व माझी आई आरोपीच्या आजीच्या घरी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने त्याचेकडे मुले ठेवले यामध्ये काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दोन दिवस मुले माझेकडे आणले नाही याचा माझे मनात राग होता. हे म्हणणे खरे नाही की, रागाच्या भरात मी व आई मुले आणण्यासाठी आजी सासूच्या घरी गेलो. आम्ही आजी सासूच्या घरी गेलो त्यावेळी मी सासूला किंवा आजी सासूला भेटलो असे झाले नाही. त्या दोन दिवसांच्या काळात मला मुलांचा फोन आला नाही, मी एमआयडीसीमध्ये कामाला जात होते. असे झाले नाही की, मी आजी सासूच्या घरी गेल्यानंतर आजी सासू व सासूला मुले घेऊन

जात असल्याबाबत सांगितले. आजी सासूच्या घरी गेल्यानंतर मी नव-याला सांगितले की, आपण मुलांना घेऊन घरी जावू. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझा नवरा म्हणाला की, आजी आजारी आहे, आईवडील आलेले आहेत, दोन दिवस येथे आपण राहू. हे म्हणणे खरे नाही की, मी व आईने तेथेच आरोपीला मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मी व माझे आई विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी आम्हाला नोटीस दिली की, पुन्हा आजीसासूच्या घरी जावू नका. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यादिवशी आरोपी व मी रेणुकानगर बोल्हेगाव येथे एकत्र राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुलांना घेऊन त्याचे आजीला भेटण्यासाठी गेला याचा मला राग आल्याने मी ही फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६-०९-२०२१ नंतर आरोपी व मी कधीही एकत्र राहिलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२१-११-२०२२ रोजी मी आरोपीला वकीलामार्फत नोटस पाठवून मला नांदण्यास घेऊन जाण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आरोपीने वकीलांमार्फत उत्तर देऊन पुणे येथे नांदण्यास येण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की,त्यानंतरही मे २०२३ मध्ये आरोपीने मला नांदण्यास येण्यासाठी वकिलामार्फत नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी नांदण्यास गेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, "तेथे माझे पतीने मला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व मी शिवीगाळ करु नका असे म्हटले असता माझे पतीने लोखंडी रॉडने माझे व माझे आईच्या डोक्यात मारले", हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या आजीच्या घरासमोर खरबुडी फरशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या आजीच्या घरासमोर नारळाच्या झाडाखाली लोखंडी पाईप पडलेले होते. आरोपीच्या आजीच्या घराचे कुंपण लोखंडी जाळीचे होते की, भिंतीचे होते, हे मी सांगू शकत नाही. घटनेच्यावेळी थोडासा अंधार पडलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीला मारत असताना मी व आई घराच्या कुंपणाला धकडलो होतो, त्यामुळे आम्हाला जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला रॉडने मारहाण केली

नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला रॉडने मारहाण केली नाही.

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत, समक्ष,

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. १३/०३/२०२४.